**जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक**
(आस्थापना शाखा)
जुने सी.बी.एस. जवळ, नाशिक - 422 002
दुरध्वनी क्रं.0253-2319006 estnashik@gmail.com फॅक्स क्रं.0253-2575703

क्र.मशा./कार्या.3/आस्था.4/१०० /2016. नाशिक.दि. -१०/10/2016.

प्रति,
श्री./श्रीमती.- दि० ६/१०/२०१६ रोजी
रा.- प्रसिद्द केलेल्या अंतरिम
निवड यादीतील संबंधित उमेदवार

विषय - **सरळ सेवा भरती प्रक्रिया सन - 2016.**
अंतरीम निवड यादीतील उमेदवार यांनी मुळ कागदपत्र पडताळणीसाठी उपस्थित राहणेबाबत. **(तलाठी पेसा क्षेत्रातील उमेदवारांसाठी)**

जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक यांचे अधिनिस्त उपविभागीय अधिकारी कार्यालय, यांचे आस्थापनेवरील तलाठी संवर्गातील रिक्त पदे भरणेसाठी पात्र उमेदवारांकडून विहीत नमून्यात ऑनलाईन अर्ज www.nashik.nic.in व www.nashikbharti.com या संकेत स्थळावरुन मागविण्यात आले होते. सदर पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा दि. 11/09/2016 रोजी घेण्यात येऊन त्याअनुषंगाने गुणवत्तेनुसार अंतरीम निवड यादी तयार करणेत येवुन दि. 6/10/2016 रोजी प्रसिध्द करणेत आलेली आहे. सदर निवड यादीमध्ये आपले नांव समाविष्ट असल्याने आपण खालील प्रमाणे आवश्यक **मूळ शैक्षणीक व इतर कागदपत्रे व त्यांचे दोन छायांकित संच सांक्षाकनासह दिनांक – 18/10/2016 रोजी सकाळी 11.00 वाजता नियोजन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे स्वखर्चाने समक्ष हजर राहून सादर करावे. सदरचे दिवशी आपण गैरहजर राहील्यास आपणास याबाबत स्वारस्य नसलेचे गृहित धरुन नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत येईल.**

१) संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या मुळ अर्जाची Print Out.
२) लेखी परिक्षेच्या प्रवेशपत्राची मुळ प्रत.
३) छायाचित्र ओळख पुरावा (ओळखपत्र / Photo Identity card, आधारकार्ड, राज्य निवडणूक आयोगाचे निवडणूक ओळखपत्र, पॅनकार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स इ.) मुळ प्रत.
४) भारतीय स्टेट बॅंकेमध्ये परीक्षा फी भरलेल्या चलनाची मुळ प्रत.
५) भारतीय नागरीक असल्याबाबतचे प्रमाणपत्राची (Nationality) मुळ प्रत.
६) महाराष्ट्र राज्याचा अधिवास असलेले प्रमाणपत्राची (Domicile) मुळ प्रत
७) महाराष्ट्र राज्य विभागीय शिक्षण मंडळ माध्यमिक शालांत परीक्षा (S.S.C.) उत्तीर्ण असल्याबाबतचे गुणपत्रकाची मुळ प्रत व परीक्षा प्रमाणपत्राची (Board Certificate) मुळ प्रत.
८) महाराष्ट्र राज्य विभागीय शिक्षण मंडळ उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (H.S.C.) उत्तीर्ण असल्याबाबतचे गुणपत्रकाची मुळ प्रत व परीक्षा प्रमाणपत्राची (Board Certificate) मुळ प्रत.
९) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेबाबतचे मुळ गुणपत्रक व पदवी प्रमाणपत्राची (Degree Certificate) मूळ प्रत
१०) शाळा सोडल्याच्या दाखल्याची (L.C./T.C.) मुळ प्रत
११) मागासप्रवर्गाच्या निवड झालेल्या उमेदवारांचे मूळ जात प्रमाणपत्र तसेच जात वैधता (Validity) प्रमाणपत्र

१२) पेसा क्षेत्रातील उमेदवार म्हणुन शासन अधिसुचना क्र.आरबी/टीसी/ई-13013(4)/नोटिफिकेशन-1/474/2014, दि. 9/6/2014 अन्वये जे अनुसूचित जमातीचे उमेदवार स्वत: किंवा त्यांचे आई-वडिल किंवा आजी-आजोबा संबंधित जिल्हयाच्या अनुसूचित क्षेत्रामध्ये 26 जानेवारी 1950 पासून सातत्याने वास्तव्य करित असल्याबाबचे पुरावे (तलाठी रहिवास दाखला, ग्रामसेवक रहिवास दाखला, सन 1950 च्या 7/12 नोंदी, आजी-आजोबांचे निवडणुक ओळखपत्र इ.)

१३) **अंशकालीन कर्मचा-यांनी** त्यांच्या अनुभवाचे सेवायोजन कार्यालयाकडे केलेल्या नोंदणीचे प्रमाणपत्र व अंशकालीन कर्मचारी म्हणून कामकाज केले असल्याबाबतचे सक्षम अधिका-याचे मूळ प्रमाणपत्र.

१४) **माजी सैनिकांनी** जिल्हा सैनिक कल्याण मंडळाकडे नांव नोंदणी केलेबाबतचे प्रमाणपत्र व सक्षम प्राधिका-याने दिलेले सैनिकी सेवे संदर्भातील मूळ प्रमाणपत्र.

१५) **संगणक अर्हता प्रमाणपत्र** (अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तरापैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे मूळ प्रमाणपत्र किंवा (ब) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांचेकडील अधिकृत MS CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे मूळ प्रमाणपत्र.

१६) **प्रकल्पग्रस्त उमेदवारासाठी** सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक न्यायप्र 1009/प्र.क्र.202/09/16-अ. दि.27/10/2009 अन्वये गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी जिल्हा पुनर्वसन अधिकारी (उपजिल्हाधिकारी पुनर्वसन) यांचे प्रकल्पग्रस्त असलेबाबत शासकीय नोकरी मिळणेसाठी विहित केलेले प्रमाणपत्राची मुळ प्रत.

१७) **अत्युच्च गुणवत्ताधारक खेळांडूसाठी** असलेले आरक्षण शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक रक्रिधो-2002/प्र.क्र.68/क्रियूसे-2.दि.30 एप्रिल 2005 मधील तरतुदीनुसार राहील. खेळाडू प्रमाणपत्र हे राष्ट्रीय व राज्यस्तरीय शासन निर्णय परिशिष्ट अ मध्ये नमूद खळाचे व प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकारी यांचे असावे.

१८) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 अन्वये शासनाने गट अ, ब, क व ड मधील पदांच्या सेवाप्रवेशासाठी एक आवश्यक अर्हता म्हणुन विहीत नमुन्यातील लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक.

१९) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नोंदणी केली असल्यास नोंदणी मूळ प्रमाणपत्र.

२०) शासकीय /निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या विभागप्रमुखांच्या परवानगीने भरले असल्यास अशा परवानगीचे मूळ पत्राची प्रत.

२१) अंतरिम निवड यादीमध्ये निदर्शनास आलेल्या वस्तुस्थितीनुसार दुरुस्ती करणे किंवा रदद करणे याचे सर्व अधिकार अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी नाशिक यांना राहतील.

सर्व कागदपत्रांची पूर्ण पडताळणी तसेच जाहीरातीतील नमूद सर्व निकषांची पुर्तता झाल्याशिवाय उमेदवारांना नियुक्तीपत्र देण्यात येणार नाही.

अध्यक्ष जिल्हा निवड समिती
तथा जिल्हाधिकारी नाशिक करिता